## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे संरक्षण व जतन करण्याकरिता, झाडे तोडण्याचे नियमन करून आणि त्या क्षेत्रांमध्ये समुचित प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४), अधिनियमित करण्यात आलेला आहे.

२. राज्याच्या विविध नागरी क्षेत्रांत नागरीकरण व औद्योगीकरण यांमध्ये सतत वाढ होत असल्यामुळे आणि अशा क्षेत्रांत विविध पायाभूत प्रकल्प जलद गतीने राबविले जात असल्यामुळे अजुनही मोठ्या प्रमाणावर बेसुमार वृक्षतोड करण्यात येत आहे. म्हणून, राज्याच्या नागरी क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीचे नियंत्रण करणे, वृक्षतोड कमी करणे आणि तिचे नियमन करणे ही तातडीची गरज आहे.

३. वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते, म्हणून, होणाऱ्या हानीस प्रतिबंध करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी, पुरातन (हेरीटेज) वृक्षांचे मोठ्या प्रमाणात संरक्षण करण्याची, झाडांची लागवड व जतन करण्याची आणि नागरी क्षेत्रांमध्ये हरित आच्छादित क्षेत्र वाढविण्याची, सुनिश्चिती करण्यासाठी उक्त अधिनियमाची कलमे २, ३, ७, ८, १८ व २१ यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे आणि त्यामध्ये नवीन कलम ६अ समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. प्रस्तावित विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(अ) " पुरातन (हेरीटेज) वृक्ष " यांचे संवर्धन करण्यासाठी तरतूद करणे ;

(ब) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटीत करणे व त्यांची कर्तव्ये यांची तरतूद करणे ;

(क) सध्या अस्तित्वात असलेल्या झाडांची गणना करण्यासाठी नवीन व आधुनिक तंत्रज्ञान साधनांचा वापर करण्याची तरतूद करणे ;

(ड) वृक्ष प्राधिकरणास, झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करणे, झाडे जिवंत राहण्याची सुनिश्चिती करणे, झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी वृक्ष उपकराचा योग्य विनियोग करणे, त्यांची शास्त्रीय व भरपाई लागवड आणि देखभाल करणे यांच्याशी संबंधित असणारी अतिरिक्त कर्तव्ये प्रदान करणे ;

(ई) झाडे तोडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांची भरपाई लागवड करण्यासाठी अधिक तपशीलवार कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(फ) जमा केलेल्या वृक्ष उपकराचा योग्य विनियोग करण्यासाठी तरतूद करणे ;

(ग) अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून पाडलेल्या झाडांकरिता शास्तीमध्ये वाढ करण्यासाठी तरतूद करणे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २८ जून २०२१.

**आदित्य ठाकरे,**
पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड २.—** उक्त अधिनियमाच्या कलम २ मध्ये "पुरातन (हेरीटेज)" या संज्ञेची व्याख्या समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, वृक्ष प्राधिकरणाद्वारे पुरातन (हेरीटेज) वृक्ष म्हणून वर्गीकृत केलेल्या झाडाची मानके अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३.—** (क) उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये पोट-कलम (अ-१) समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या उप-खंड (१) अन्वये, शासनाच्या सचिव पदापेक्षा कमी दर्जाचे नसतील अशा अधिकाऱ्यांचा समावेश असणारे, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ; आणि

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या, उप-खंड (३) अन्वये, प्रत्येक वृक्ष प्राधिकरण, झाडांची लागवड (रोपण), जतन व संरक्षण यांमधील अनुभव असलेल्या तज्ज्ञ बिन-सरकारी संघटनांसह सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांना नामनिर्देशित करण्यासाठीचा किमान कालावधी अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६.—** (क) उक्त अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये उप-खंड (सहा), समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या, उप-खंड (२)(अ)(दोन) अन्वये, पाडावयाच्या झाडाचे वय निर्धारित करण्याचे निकष व पद्धती अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (५) मध्ये खंड (ब) समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या, उप-खंड (४)(क) अन्वये, पाडावयाच्या झाडाचे वय निर्धारित करण्याचे निकष व पद्धती अधिसूचित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ; आणि

(ग) उक्त अधिनियमाच्या कलम ८ मध्ये पोट-कलम (५अ) समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या उप-खंड (५) मध्ये पहिल्या परंतुका अन्वये, पाडावयाच्या झाडांची मूल्यांकन पद्धती अधिसूचित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८.—** (क) उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट-कलम (१) ची सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, पाडलेल्या झाडांचे मूल्यांकन निर्धारित करण्याची पद्धती ठरविण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकारी सोपविण्यासंबंधीचे उपरोल्लिखित प्रस्ताव हे सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी ४३२–२ (८४०–६-२०२१)

## सन २०२१ चे वि.स.विधेयक क्रमांक ८. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

## [महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यातील उतारे]

## (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम ४४)

**१.** ते **२.** ** ** ** ** ** **

**३.** **(१)** ** ** ** ** ** ** वृक्ष प्राधिकरणाची स्थापना.

**(२)** खालील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत, त्याच्या वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष, त्याच्या स्तंभ (२) मध्ये त्याच्यासमोर विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती असेलः—

| | नागरी स्थानिक प्राधिकरणाचे नाव<br>(१) | त्याच्या वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष<br>(२) |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका | महानगरपालिकेचा (आयुक्त) |
| २. | नगरपालिका | नगरपालिकेचा अध्यक्ष |
| ३. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४०(१) (क) अन्वये घटित करण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकरण. | विशेष नियोजन प्राधिकरणाचा (मुख्य कार्यकारी अधिकारी) |
| ४. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३(२) अन्वये घटित करण्यात आलेले नवीन नगर विकास प्राधिकरण. | नवीन नगर विकास प्राधिकरणाचा (मुख्य कार्यकारी अधिकारी) |
| ५. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३(३-क) अन्वये जाहीर करण्यात आलेले नवीन नगर विकास प्राधिकरण किंवा त्या अधिनियमाच्या कलम ४० (१) (ख) अन्वये नेमण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकरण. | नवीन नगर विकास प्राधिकरण म्हणून जाहीर करण्यात आलेल्या महामंडळाचा किंवा कंपनीचा व्यवस्थापन संचालक. |

(३) प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा, बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य म्हणून (नामनिर्देशित करता) येईल. परंतु अशा (नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.) हे सदस्य, (विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नामनिर्देशित) करण्यात येईल.

(४) आणि (५) ** ** ** ** ** **

**४.** ते **६.** ** ** ** ** ** **

**७.** संबद्ध अधिनियमात किंवा त्यापैकी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण निदेशांस अधीन राहून, वृक्ष प्राधिकरण पुढील गोष्टींसाठी जबाबदार राहीलः— वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये.

(क) ** ** ** ** ** **

"(५) एखादे झाड तोडण्यास परवानगी देण्यात आली असेल किंवा पोट-कलम (४) अन्वये परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात आले असेल त्याबाबतीत, अर्जदार, त्याच जातीची किंवा इतर योग्य त्या स्थानिक जातीची झाडे, त्याच ठिकाणी किंवा आवश्यक असल्यास, प्राधिकरण ठरवून देईल अशा अन्य योग्य त्या जागी त्या झाडांच्या दुप्पट संख्येइतकी झाडे लावील. अशा अन्य योग्य ठिकाणासह त्याच जागेवर किंवा इतर अन्य योग्य ठिकाणी लावावयाची झाडांची संख्या, प्राधिकरणाने द्यावयाच्या परवानगीमध्ये नमूद करण्यात येईल. झाडे तोडण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा याबाबत वृक्ष अधिकारी परवानगी देईल अशा वाढीव मुदतीच्या आत झाडे लावण्यात येतील :

परंतु, देण्यात आलेली अशी वाढीव मुदत पंधरा दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.";

(६) ** ** **

**९.** ते **२०.** ** ** **

**२१.** (१) (अधिनियमाच्या) तरतुदींचे उल्लंघन करून जी कोणतीही व्यक्ती कोणतेही झाड तोडील किंवा कोणतेही झाड तोडण्यास कारणीभूत होईल किंवा (वृक्ष अधिकाऱ्याने किंवा वृक्ष प्राधिकरणाने लादलेल्या शर्तींचे किंवा दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर करील किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्यांस किंवा वृक्ष अधिकाऱ्यास किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या अधिनियमाखालील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात स्वेच्छेने अडथळा आणील त्या व्यक्तीला अपराधसिद्धीनंतर, प्रत्येक अपराधाकरिता एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि एक आठवड्यापेक्षा कमी नसेल व एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाचीदेखील शिक्षा होईल : अपराध व शास्ती.

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, राज्य किंवा केंद्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने काम सुरू केलेल्या सार्वजनिक रस्त्यांवरील किंवा त्यांच्याकडेने असलेली झाडे तोडण्याच्या संबंधात लागू होणार नाही.)

(२) ** ** **

**२२.** ** ** **

